Website: www.word-pdf-convert.com

के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय

अ.प्र.क्र. बीएनडी-५४/मंगरुळ नवघरे /०१/२००९-०१०

श्री. अच्युतराव नामदेव नवघरे
रा. मंगरुळ नवघरे ता. चिखली
जि. बुलडाणा - - अपिलार्थी

विरुध्द

श्री.सुधाकर बाजीराव तांगडे,
रा. गजानन नगर चिखली
ता.चिखली जि. बुलडाणा - - प्रतिवादी

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

आदेश

( पारित दिनांक २५ ऑगस्ट, २०१० )

मौजे मंगरुळ नवघरे ता.चिखली जि.बुलडाणा येथील गट क्र. ३६३ मधील जमीनीच्या पोटहिस्याची मोजणी करण्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ (२) अन्वये नायब तहसिलदार चिखली यांनी रा.प्र.क्र. बीएनडी-५४/मंगरुळ नवघरे /३/२००७-०८ मधील दिनांक २५.२.२००८ चे आदेशान्वये अनुमती दिलेली आहे. सदर आदेशाने व्यथित होऊन प्रतिवादी यांनी उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांचेकडे अपिल दाखल केले असता रा.प्र.क्र.बिएनडी-५४/मंगरुळ नवघरे/०२/२००७-०८ मधील आदेश दिनांक २२.९.२००९ अन्वये अपिल मंजुर करुन नायब तहसिलदार चिखली यांचा आदेश रद्द केलेला आहे. उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांचे दिनांक २२.९.२००९ चे आदेशा विरुध्द अपिलार्थी यांनी सदर अपिल दाखल केलेले आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन प्रतिवादीस नोटिस देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांचे वकिलाणी प्रकरणात पुरसिस दाखल करुन अपिल मेमो हाच लेखी युक्तीवाद समजण्यात यावा असे नमुद केलेले आहे.अपिल मेमो मध्ये त्यांनी प्रामुख्याने नमुद केले आहे की,कनिष्ठ कोर्टात अपिल दाखल केले आहे. ते मुदतबाहय असल्याने प्रतिपालनीय नाही. कनिष्ठ कोर्टाने यापुर्वी म्हणजे दिनांक १७.१२.२००३ रोजी याच प्रकरणात जमीन मोजण्याची परवानगी द्यावी असा आदेश पारित केला होता गट नं. ३६३ मधील अपिलार्थी व त्यांची पत्नी हयांची अनु क्रमे १.२० हे.आर. आणि १.२१ हे.आर. व प्रतिवादी हयांचे वडिलांचे नामे श्री. बाजीराव देवराव तांगडे यांची १.१९ हे.आर. शेत जमीन वाटणी करुन घेतली आहे.अपिलार्थीची जमीन कमी असल्यामुळे सरकारी मोजणी करण्याचा अर्ज तहसिलदार चिखली यांचेकडे देऊन प्रकरण सुरु केले. त्यानुसार तहसिलदार चिखली यांनी २५.२.२००८ चे आदेशानुसार मोजणी करण्याचे आदेश दिले आहे. मोजणी फी भरुण गटाची मोजणी केली. तालुका निरिक्षक भुमी अभिलेख चिखली यांनी सर्व संबधीतांना नोटिसा दिल्या आहेत. त्यावेळी कोणत्याही हितसंबधीत शेतकरी यांनी हरकत उपस्थित केली नाही. मोजणी

Website: www.word-pdf-convert.com

करुन गट नं. ३६३ मधील शेतकऱ्यांनी आपआपले क्षेत्रा नुसार खुणा कायम केल्या आहेत.मोजणी मध्ये प्रतिवादी यांनी अपिलार्थीचे ०.३३ हे.आर. क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे आढळले मोजणीचा नकाशा तयार करुन अहवाल तहसिलदार चिखली यांना सादर केलेला आहे. तालुका निरिक्षक भुमीअभिलेख चिखली यांनी क्षेत्रानुसार जमीनी ताब्यात दिल्या पुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नव्हते व नाही. अशी परिस्थिति असतांना हिस्यानुसार ताबा मिळाल्यावर कनिष्ठ कोर्टाने सदर प्रकरणात कायदेशीर रित्या हस्तक्षेप करण्यास वाद नव्हता सबब उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांचा दिनांक २२.९.२००९ चा आदेश रद्द करण्यात यावा.

प्रतिवादी यांना वारंवार संधी देऊनही त्यांनी प्रकरणात लेखी अथवा मौखीक युक्तीवाद दाखल केला नाही.

अपिल मेमो मधील मुद्दे, कनिष्ठ कोर्टाचे प्रकरणे व त्यात पारित केलेले आदेशाचे अवलोकन केले. तालुका निरिक्षक भुमीअभिलेख चिखली यांचे पत्र जा.क्र. ११९९/२००८ दिनांक २.६.२००८ अन्वये वादातील गट नं. ३६३ ची मोजणीची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.मोजणीची कार्यवाही नियमानुसार पुर्ण झालेली असत्याने प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपील मंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी,बुलडाणा यांनी रा.प्र.क्र. बीएनडी-५४/मंगरुळ नवघरे /०२/२००७-०८ मध्ये दिनांक २२.०९.२००९ रोजी पारीत केलेला आदेश रद्द करण्यात येत आहे. नायब तहसिलदार चिखली यांनी रा.प्र.क्र. बीएनडि-५४ / मंगरुळ नवघरे/०३/२००७-०८ मध्ये दिनांक २५/२/२००८ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

(के.एम.कामुने)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

**प्रतिलिपी**

१) उप विभागीय अधिकारी, बुलडाणा यांना त्यांच्या फाईलवरील राप्र.क्र. बीएनडी-५४/मंगरुळ नवघरे /०२/२००७-०८ सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित

२) नायब तहसिलदार चिखली यांना त्यांच्या फाईलावरील रा.प्र.क्र. बीएनडी-५४/मंगरुळ नवघरे/०३/२००७-०८ सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा